जनसंपर्क अधिकारी

पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव

फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११

Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in


## -:प्रेस नोट :-

दिनांक :- २२/०५/२०२६

# " एम.आय.डी.सी. पोलिसांची मोठी कारवाई; दुचाकी चोरणारे २ आरोपी गजाआड, ४ मोटारसायकली हस्तगत "

**एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशनच्या गुन्हे शोध पथकाने धडक कारवाई करत मोटारसायकल चोरणाऱ्या दोन अट्टल चोरांना अटक केली आहे. त्यांच्या ताब्यातून वेगवेगळ्या कंपन्यांच्या एकूण १,८७,०००/- किंमतीच्या 0४ मोटारसायकली जप्त करण्यात आल्या आहेत.**

दिनांक १७/०५/२०२६ रोजी रात्री ०८:३० वाजेच्या सुमारास फिर्यादी श्री. संतोष रणछोड सैंदाणे वय ४७, धंदा-नोकरी, रा. वाघ नगर, जळगाव यांची होंडा शाईन मोटारसायकल क्र. MH 19 CL 7558 सिंधी कॉलनी रोडवरील समर्थ हॉस्पिटलसमोरून अज्ञात चोराने चोरून नेली होती. त्याअनुषंगाने एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि.नं. 433/2026, भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयांचे गांभीर्य लक्षात घेता मा. श्री. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, जळगांव यांनी तात्काळ पथक स्थापन करुन गुन्हा उघड करुन चोरीस गेलीली मोटारसायकल हस्तगत करणे बाबत आदेशीत केले, त्यानुषंगाने एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. बबन आव्हाड यांनी तात्काळ गुन्हे शोध पथकातील पोलीस अधिकारी/अंमलदार यांना सदर गुन्हा उघड करणे बाबत मार्गदशन करत सुचना दिल्या असता पथकाने घटनास्थळासह जळगाव शहरातील विविध भागांतील सीसीटीव्ही (CCTV) फुटेज 'नेत्रम' कार्यालयातील पोकॉ/मुबारक देशमुख यांच्या मदतीने तपासले. तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे **आरोपीत नामे १) महेंद्र गोपाल चव्हाण वय २३ वर्षे, व्यवसाय-मजुरी, रा. खोटे नगर, जळगाव २) मुकेश ताराचंद चव्हाण वय २६ वर्षे, रा. पिंप्राळा हुडको, जळगाव** यांना ताब्यात घेवुन त्यांच्याकडे गुन्हयां संदर्भात कौश्यल्यपुर्ण चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. आरोपी क्रमांक १ याच्या ताब्यातून खालील प्रमाणे ४ दुचाकी हस्तगत केल्या

1) **५०,०००/- रु किंमतीची होंडा शाईन (काळा रंग) क्रमांक MH 19 CL 7558**
2) **५२,०००/- रु किंमतीची टीव्हीएस वेगो मोपेड क्रमांक MH 19 CA 5949**
3) **५०,०००/- रु किंमतीची हिरो डिलक्स क्रमांक MH 18 AK 0235**
4) **३५,०००/- रु किंमतीची बजाज पल्सर क्रमांक MH 19 ER 5456**

---

**एकूण जप्त मुद्देमाल १,८७,०००/- रु किंमतीचे 04 मोटार सायकल**

**सदरची कार्यवाही कामगिरी पोलीस अधीक्षक श्री. श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक, श्री. संदीप गावीत, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. नितीन गुणापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली एम.आय.डी.सी.चे पोलीस निरीक्षक श्री. बबन आव्हाड यांचे नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक राहुल तायडे, चंद्रकांत धनके, पोहेकॉ/३९६ किरण चौधरी, पोकॉ/२०३० गणेश ठाकरे, पोकॉ/२४९६ रमाकांत साळुंखे, पोकॉ/१३९५ शशिकांत मराठे, पोकॉ/३४२ किरण पाटील आणि पोकॉ/३२३३ योगेश घुगे तसेच 'नेत्रम' येथील पोकॉ/मुबारक देशमुख या पथकाने उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरी केली आहे.**

**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, जळगांव**

*********************************************************************************************************


फोन नं. 0257 - 2210500 / 2210163
SMART POLICING
एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन, जळगाव